1

308

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १५/०३/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीटीई-३११८/ प्र.क्र.११/ पोल-३ दिनांक १४ मार्च, २०२४.

**विषय :-** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांच्या आस्थापनेवरील अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण या पदास मुदतवाढ देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. सीटीई-३११८/ प्र.क्र.११/ पोल-३, दिनांक १४ मार्च, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०३१४१७२७४५६७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, (नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-ब

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण या पदास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीटीई-३११८/प्र.क्र.११/ पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०२४

वाचा:-

१) शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयपीएस-१२०५/प्र.क्र.६०१/पोल-१,दि.३.१.२००६
२) शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयपीएस-१२०५/प्र.क्र.३३२/पोल-१,दि.१०.२.२०१२
३) शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयपीएस-१२१२/प्र.क्र.१६८/पोल-१,दि.९.४.२०१२
४) शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयपीएस-१३१३/प्र.क्र.४५३/पोल-१,दि.२१.१०.२०१३
५) शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयपीएस-१३१४/प्र.क्र.११३/पोल-१,दि.१९.०३.२०१४
६) शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयपीएस-१३१५/प्र.क्र.३२/पोल-१,दि.३०.०३.२०१५
७) शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयपीएस-०३१५/प्र.क्र.७८/पोल-१,दि.२०.१०.२०१५
८) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३११८/प्र.क्र.११/पोल-३, दि.२१.०९.२०२०
९) शासन निर्णय, गृह विभाग क्र.आयपीएस-१५१९/प्र.क्र.३०७/भाग-२/पोल-१ दि.१७.०९.२०२०
१०) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३११८/प्र.क्र.११/पोल-३, दि.२६.०३.२०२१
११) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३११८/प्र.क्र.११/पोल-३, दि.३०.०९.२०२१
१२) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३११८/प्र.क्र.११/पोल-३, दि.२३.०३.२०२२.
१३) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३११८/प्र.क्र.११/पोल-३, दि.३०.०९.२०२२.
१४) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३११८/प्र.क्र.११/पोल-३, दि.०२.०३.२०२३.
१५) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३११८/प्र.क्र.११/पोल-३, दि.२१.०९.२०२३
१६) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/अपोमसं (नाहसं)/१३/२००६, दि.२७.०२.२०२४.
१७) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०२४.

प्रस्तावना:-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापेवरील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई या पदाच्या कामकाजाचा व्याप वाढल्यामुळे संदर्भ क्र.१ येथील दिनांक ०३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयान्वये या पदाची अपर पोलीस महासंचालक, नागरी संरक्षण,



Scanned with CamScanner

महाराष्ट्र राज्य, मुंबई दर्जाच्या पदामध्ये प्रथमत: श्रेणीवाढ करण्यास मान्यता देण्यात आली होती. गृह विभाग, शासन निर्णय, दि.०५.१०.२०१० व्दारे या पदास पुन्हा विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई असे श्रेणी अवनत करण्यात आले. उक्त अस्थायी पदास दिनांक २८.०२.२०१० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

तद्नंतर शासनाने या पदाची अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई अशी श्रेणीवाढ करण्यात आली आहे. गृह विभाग, शासन निर्णय, दि.२०.१०.२०१५ अन्वये सदर पदास पुन्हा विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई असे श्रेणी अवनत करण्यात आले आहे.

तद्नंतर संदर्भ क्र.९ येथील दि.१७.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयन्वये या पदाची अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई अशी श्रेणीवाढ करण्यात आली आहे. त्यानंतर या पदास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून, संदर्भाधिन क्र.१५ येथील दि.२१.०९.२०२३ च्या शासन निर्णयाद्वारे दि.०१.०९.२०२३ ते दिनांक २९.०२.२०२४ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. म्हणून या पदास दि.०१.०३.२०२४ पासून पुढे मुदतवाढ द्यावयाची असल्याने, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालय यांनी संदर्भ क्र.१६ येथील दि.२७.०२.२०२४ व्दारे मुदतवाढीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आस्थापनेवरील विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण हे पद ज्या परिस्थितीत श्रेणी उन्नत केले होते ती परिस्थिती अद्यापही कायम असून, सदर अस्थायी पद सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त नव्हते. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आस्थापनेवरील अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण या अस्थायी पदास **दिनांक ०१ मार्च, २०२४ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत** खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरित पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्याचे पालन करण्यात यावे.

२. सदरचा खर्च "२०५५-पोलीस-००१-संचालन व प्रशासन-पोलीस निरीक्षालये" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २१.०२.२०२४ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२४०३१४१७२७४५६७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=47D160717AE29C2D266185275DBB984CFAE93B93BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2024.03.14 17:37:07 +05'30'

(कैलास गायकवाड)

सह सचिव, गृह विभाग

प्रत,

१. महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
७. गृह विभाग, कार्यासन (बीयुडी-१/पोल-१/विशा-६).
८. वित्त विभाग (व्यय-७) / वित्तिय सुधारणा-१.
९. निवड नस्ती (पोल-३).



Scanned with CamScanner